# नवी मुंबई महानगरपालिका
## महापालिका सर्वसाधारण सभा

महानगरपालिकेच्या बुधवार, दिनांक 21/09/2016 रोजी भरलेल्या माहे जुलै महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| विषय क्र. 03.<br>दिनांक 20 जुलै 2016 | स्थायी समितीच्या बुधवार, दिनांक 15 जून 2016 चा ठराव क्र. 11 :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 376 प्रकरण 18 मधील भाग 4 अनुसूची 'ड' नुसार उपहारगृह, स्विटमार्ट इत्यादी व्यवसायांच्या व्यवसाय परवाना शुल्कात वाढ करणेबाबत आयुक्तांचे दिनांक 03/05/2016 चे पत्र क्र. नमुमपा/परवाना विभाग/1861/ 2016. |
| ठराव क्र. 1256.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "प्रस्तृत विषय सभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने फेरविचारार्थ आयुक्तांकडे परत पाठविण्यात यावा." |
| निर्णय - | आयुक्तांकडे परत. |
| विषय क्र. 06.<br>दिनांक 20 जुलै 2016 | नवी मुंबई महानगरपालिकेचा सन 2012-13 या वर्षाचा स्थानिक निधी लेखापरिक्षण अहवाल व त्याबाबत विभागांकडील अनुपालन सादर करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 27/05/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/लेखा/स्था.नि.ले./759/2016. |
| ठराव क्र. 1257.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "नवी मुंबई महानगरपालिकेचा सन 2012-13 या वर्षाचा मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षण अधिनियम 1930 च्या कलम-10 (1) नुसार लेखापरिक्षण अहवाल व त्याबाबत विभागांकडील अनुपालन अहवाल दप्तरी दाखल करण्यात यावा." |
| निर्णय - | दप्तरी दाखल. |
| विषय क्र. 07.<br>दिनांक 20 जुलै 2016 | ठाणे-बेलापूर रस्ता विटावा ते रबाळे पोलीस स्टेशन दरम्यान वार्षिक देखभाल दुरुस्ती(CH. 1200 to CH. 5726) (Annual Maintainance Contract) करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/06/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ./527/2016. |
| ठराव क्र. 1258.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "ठाणे-बेलापूर रस्ता विटावा ते रबाळे पोलीस स्टेशन दरम्यान वार्षिक देखभाल दुरुस्ती(CH. 1200 to CH. 5726) (Annual Maintainance Contract) करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 89 लाख, 64 हजार 265 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | मंजूर |

| | |
|---|---|
| विषय क्र. 08.<br>दिनांक 20 जुलै 2016 | ठाणे-बेलापूर रस्ता रबाळे पोलीस स्टेशन ते महापे दरम्यान वार्षिक देखभाल दुरुस्ती (CH. 5726 to CH. 10000) (Annual Maintainance Contract) करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/06/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ./528/2016. |
| ठराव क्र. 1259.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "ठाणे-बेलापूर रस्ता रबाळे पोलिस स्टेशन ते महापे दरम्यान वार्षिक देखभाल दुरुस्ती(CH. 5726 to CH. 10000) (Annual Maintainance Contract) करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 78 लाख, 14 हजार, 927 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |
| विषय क्र. 09.<br>दिनांक 20 जुलै 2016 | ठाणे-बेलापूर रस्ता महापे ते तुर्भे जंक्शन दरम्यान वार्षिक देखभाल दुरुस्ती (CH. 10000 to CH. 14800) (Annual Maintainance Contract) करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/06/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ./529/2016 |
| ठराव क्र. 1260.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "ठाणे-बेलापूर रस्ता महापे ते तुर्भे जंक्शन दरम्यान वार्षिक देखभाल दुरुस्ती (CH. 10000 to CH. 14800) (Annual Maintainance Contract) करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 88 लाख, 93 हजार, 580 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |
| विषय क्र. 10.<br>दिनांक 20 जुलै 2016 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना तयार करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/06/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर/3901/2016 |
| ठराव क्र. 1261.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना करणेसाठी महानगरपालिका अधिकार कक्षेतील क्षेत्राचे सर्वेक्षण करणे तसेच सर्व क्षेत्रातील जमिनीचा विद्यमान वापर दर्शविणारा नकाशा तयार करणे व मुळ मंजूर विकास योजनेची (फेरतपासणी) तसेच मूळ विकास योजना क्षेत्राच्या बाहेरील नव्याने विकास योजना तयार करण्यासाठी सविस्तर नियोजने दर्शविणारा प्रारुप विकास आराखडा इत्यादी बाबी तयार करुन घेणे व त्या संबंधित उक्त अधिनियमातील कलम 38 व 21 सह 22 ते 30 नुसारची संपुर्ण वैधानिक कार्यवाही पार पाडण्यासाठी उक्त अधिनियमातील कलम 24 नुसार सहाय्यक संचालक, नगररचना, नवी मुंबई महानगरपालिका यांचे ‘नगर रचना अधिकारी’ म्हणून नेमणूक करण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |

| | |
|---|---|
| विषय क्र. 11.<br>दिनांक 20 जुलै 2016 | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी अंमलात असलेल्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर करणेबाबतची तरतूद समाविष्ट करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/06/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर/3902/2016. |
| ठराव क्र. 1262.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी अंमलात असलेल्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर करणेबाबतची तरतुद समाविष्ट करणेसाठी विकास नियंत्रण नियमावली -1994 मधील विद्‌यमान नियम क्र. 36 व नविन नियम क्र. 36(अ) समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966चे कलम 37(1) नुसार फेरबदलाबाबतची प्रस्तावित निम्ननिर्देशित कार्यवाही:-<br>1) उक्त प्रारुप नियम - परिशिष्ट 'अ' सुचना - हरकती मागविणेसाठी महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये तसेच दोन स्थानिक वर्तमानपत्रांत प्रसिध्द करणे.<br>2) प्राप्त झालेल्या सुचना/हरकत धारकांना सुनावणी देणे.<br>3) सुचना/हरकती विचारात घेऊन प्रारुप नियम-परिशिष्ठ 'अ' मध्ये आवश्यक तर दुरुस्ती करणे.<br>4) अंतिम नियम - परिशिष्ट 'अ' शासनास मंजुरीसाठी सादर करणे.<br>तसेच वरील प्रमाणे कार्यवाही व संपुर्ण वैधानिक कार्यवाही पार पाडण्यासाठी मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |
| विषय क्र. 12.<br>दिनांक 20 जुलै 2016 | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन 1949 चा मुंबई अधिनियम क्रमांक 59) च्या कलम 56(1)(ब) च्या तरतूदीनुसार कलम 45 खाली नियुक्त करण्यात आलेल्या सहाय्य क आयुक्त या संवर्गातील अधिका-यांस निलंबीत केलेबाबत मा. महासभेस अवगत करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 14/06/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशा/आस्था-6/प्र.क्र. 609/2731/2016 |
| ठराव क्र. 1263.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सन 1949 चा मुंबई अधिनियम क्रमांक 59) च्या कलम 56(1)(ब) च्या तरतुदीनुसार कलम 45 नुसार सहाय्यक आयुक्त या संवर्गातील अधिकारी श्री. बाळकृष्ण शत्रुघ्न पाटील व श्री. साहेबराव दगडू गायकवाड यांना दि. 27/05/2016 रोजी निलंबित केलेबाबत मा. महासभेत अवगत करण्यास, आणि सदर बाब महानगरपालिकेच्या <u>दप्तरी दाखल</u> करण्यास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | <u>दप्तीरी दाखल.</u> |

| | |
|---|---|
| विषय क्र. 13.<br>दिनांक 20 जुलै 2016 | नामकरण प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 17/06/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/जसं.5/2780/2016 |
| ठराव क्र. 1264.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शाळा क्र. 55 राबाडा, नवी मुंबई येथील शाळेच्या सभागृहास स्व. सुनील सोनी सभागृह असे नामकरण देण्यासंबंधातील आयुक्तांच्या प्रस्तावास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |
| विषय क्र. 14.<br>दिनांक 20 जुलै 2016 | नवी मुंबई महानगरपालिका विदयमान क्षेत्राची विकास योजना तयार करणेसाठी खाजगी संस्थेची नियुक्ती करणे ऐवजी विकास योजनेची कार्यवाही महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 28/06/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर/4229/2016. |
| ठराव क्र. 1265.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "प्रस्तुत विषयावरील विचार तहकूब करण्यांत यावा आणि मा. महापौर निश्चित करतील त्या दिवशी त्यावेळी भरणा-या सभेत तो विचारात घेण्यांत यावा.." |
| निर्णय - | <u>स्थगीत.</u> |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
महानगरपालिका सचिव,
नवी मुंबई महानगरपालिका